JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# भारतीय शेती विकासातील अडथळे आणि उपाययोजना

प्रा. डॉ. महेश शामराव दाडगे
संगीत विभाग प्रमुख
नवगण कला व वाणिज्य महाविद्यालय,
परळी वैजनाथ. ता. परळी वै. जि. बीड .

**सारांश :-**

जागतिकीकरण ही संकल्पना जगामध्ये फार जुनी आहे. विशेष म्हणजे भारतात सुद्धा ही संकल्पना भारतीय संस्कृतीत अत्यंत प्राचीन आहे. परंतू जगामध्ये जेव्हा त्यापारवाद, निसर्गवाद अस्तित्वात होता व ॲडम स्मिथचे निहस्तक्षेपाचे धोरण या विचारामध्ये जागतिकीकरण ही संकल्पना होतीच. परंतू तिचे नावरूप वेगळे होते.जेव्हा प्रथम व द्वितीय महायुद्ध व जागतिक महामंदी उद्‌भवली तेव्हा जगात मात्र आर्थिक व्यापारातील अस्थिरता आर्थिक संकट निर्माण झालेले होते. त्यामुळै काहीं विकसित देशांनी विकसनशिल देशांना सोबत घेऊन युनो आंतरराष्ट्रीय नाणेनिधी जागतिक बँक, गॅट इत्यादी जागतिक संघटना स्थापन करण्यात आल्या. भारतात जेव्हा १९९० मध्ये आर्थिक अस्थिरता व परकिय चलनाच्या गंगाजळीचा तुटवडा भासला तेव्हा भारताने २१ जुन १९९१ रोजी नविन आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबविला. या कार्यक्रमातच जागतिकीकरण ही संकल्पना राबविण्यात आली.

जागतिकीकरणाच्या व्याख्या:-

१. जागतिक बँक :- जागतिकीकरण म्हणजे उपभाग्य वस्तुंच्या समावेशसह सर्व वस्तूंवरील आयात नियंत्रणे हळुहळु रद्द करणे. आयात जकातीचे दर कमी करणे. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे खाजगीकरण करणे होय.[१]

२. रूसी मोदी यांच्यामते :- जागतिकीकरण म्हणजे खुली स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान यातून उत्पादकता आणि उत्पादन वाढविणे तसेच संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि वस्तू व सेवा यांची विक्री करणे होय.[२]

३. प्रा. दिपक नय्यर यांच्या मते :- राष्ट्रांच्या राजकीय आणि भौगालिक सिमारेषा ओलांडून केले जाणारे आर्थिक व्यवहार म्हणजे जागतिकीकरण होय.[३]

4. थॉमस फ्रिडमन यांच्या मते :- जागतिकीकरण म्हणजे व्यापार वित्त आणि माहितीच्या एकत्रीकरणातून एकच एक अशी जागतिक बाजारपेठ आणि संस्कृतीची निर्मिती होय.४

भारत हा शेती प्रधान देश आहे. भारताचा जवळ जवळ ७० टक्के भाग ग्रामीण आहे. ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजगार पुरविणारे शेती हे प्रमुख क्षेत्र आहे. १९९४ साली

(WTO) च्या करारावर सह्या झाल्यानंतर देशाच्या शेती क्षेत्रात काय बदल झालेत याचे सतत निरीक्षण व अभ्यास होत आहे. आंतरराष्ट्रीय संस्थाचे प्रतिनिधी भारतात येतात. येथे येवून इतर क्षेत्रातील प्रगतीकडे पाहून भारताचे भरभरून कौतुक करतात. पण शेती क्षेत्रात पाहिजे त्या प्रमाणात परिवर्तने सरकार करीत नाही. याबद्दल नाराजी व्यक्त केली जाते. सर्वच देशात कमी अधिक प्रमाणात शेतकऱ्यांची परिस्थिती हलाकीची आहे. कारण कारखानदार शेतीतील कच्च्या मालाच्या किमती दाबून ठेवतो. त्यात वाढ होवू देत नाही. शेतीला परंपरागत व्यवसायातून केपनीत रूपांतर करणे म्हणजे शेती सुधार असा अर्थ घेतला जातो. मोठा व्यापारी वर्ग मालाची साठवण करून त्यावर नफा मिळवतो मात्र लहाण शेतकऱ्यांना गरजेपोटी तात्काळ शेतीमाल विकावा लागतो. शेतकरी, व्यापारी व कारखानदार या तिघांमध्ये कमी ताकद असणारा लहान व मध्यम शेतकरीच आहे. शेतकऱ्यांमध्ये संघटनांचा अभाव असल्यामुळे तो गरीब आहे. सर्व शेतकऱ्यांना कारखाण्यातील मजुरांपेक्षाही कमी मजुरी मिळते. शेतकरी शेतात टिकुन राहावा म्हणून व त्याच्या मालाचा उत्पादन खर्च भरून देण्यासाठी अर्थ साह्य देण्यात येते म्हणून बाजार व्यवस्था जागतिकीकरणात शेतकऱ्याला उचित भाव देईल हे समजणे चूक ठरेल. अर्थात त्यातून मोठा ओलीत शेती करणारा उच्च किमतीचा , निवडक पिके घेणारा एक शेतकऱ्यांचा वर्ग संपन्न होईल हा वर्ग संख्येने मर्यादित असाच असेल. भारतातील शेतीक्षेत्रात आज अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

**भारतीय शेती समोरील आव्हाणे :-**

१. भारतातील जमीनीपैकी ६५ टक्के जमीन कोरडवाहू:-

भारतात एकुन ६५ कोटी शेतकरी आहेत. तर युरोपात ५० लाख व अमेरिकेत २० लाख शेतकरी आहेत. आय. टी. व उद्योगात आपले स्थान उंचावर आहे. शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विदेशी लोक आपल्याकडे येत असतात.[५] भारत हा शेती प्रधानदेश असला तरी भारतातील शेतकरी समुदायापैकी ९३ टक्के शेतकरी ४ हेक्टर जमीनधारणेच्या आतले आहेत. त्यापैकी साधारण ७६ टक्के शेतकऱ्यांकडे २ हेक्टर पेक्षा कमी जमीन असून यापैकी ५४ टक्के शेतकरी केवळ १ हेक्टर जमीनीचेच मालक आहेत एकुण आपल्या देशातील शेतकऱ्यांकडील शेतजमीनीची फार कमी धारणशक्ती हीच एक मोठी समस्या असून यातील बहुतांश शेतकरी गरीब व साधन वंचित आहेत. भारतातील ६५ टक्के जमीन कोरडवाहू असून मान्सून मधील पासाच्या लहरीवर अवलंबून आहे. त्यामुळे आपल्या देशातील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविताना विदेशी शेतीचे प्रारूप व तंत्रज्ञान जसेच्या तसे वापरून चालणार नाही.

२. भारतीय शेतीत रासायनिक खतांचा जास्त वापर :-

जागतिकीकरणामुळे भारतात शेतकऱ्यामध्ये उत्पादन वाढ करण्य ासाठी स्पर्धा सुरू झाली आहे. ही स्पर्धा करताना शेतकरी शेतात रासायनिक खतांचा जास्त प्रमाणावर वापर करत आहेत. रासायनिक खतांचा शेतात वापर केल्यामुळे जमीनीचा पोत घसरुन क्षार व दलदलयुक्त जमीनीचे प्रमाण वाढत आहे.[६] भारतात शेतकरी हा शेंद्रिय खताचा वापर करण्याऐवजी रासायनिक खतांचा वापर जास्त प्रमाणात करीत आहेत. रासायनिक खतांचा वापर जास्त केल्यामुळे उत्पादनात वाढ होत आहे परंतू भविष्याच्या दृष्टीने विचार केल्यास रासायनिक खतांचा वापर करणे धोकादायक आहे. रासायनिक खतांच्या वापरामुळे जमीनीचा पोत घसरुन क्षार व दलदलयुक्त जमीन निर्माण होत आहे. त्यामुळे रासायनिक खतांचा वापर करणे हे योग्य नाही.

३. संकरीत बियाणे खरेदी करताना होणारी लूट :-

संकरीत वियाणे शेतकऱ्यांना दरवर्षी विकत घ्यावी लागत असल्यामुळे बियाणांच्या संदर्भात शेतकरी पुर्णपणे परावलंबी झाले आहेत. शेतकऱ्यांची बियाणांच्या बाबतीत बाजाराकडून होणारी लुट थांबविण्यासाठी जास्त उत्पादन देणाऱ्या सरळ वाणांच्या निर्मितीवर भर देणे गरजेचे आहे.[७] भारतात संकरीत बियानांची विक्री करणारे विक्रेते

शेतकऱ्यांची अडवणूक करण्याचा प्रयत्न करतात. चांगल्या कंपन्यांच्या मालाचा तुटवडा असल्याचे सांगून अडवणूक करतात. न खपणारा माल जास्त किंमतीत विकण्याचा प्रयत्न करतात. काही शेतकरी पेरणीच्या अगोदरपासून खते व बियाणे विकत घेतात कारण पुन्हा तुटवडा होऊ शकतो म्हणून पण सर्वच शेतकरी आर्थिक परिस्थितीमुळे असे करू शकत नाहीत. त्यामुळे ऐनवेळी खत आणि बी-बियाणे विकत घेणाऱ्या शेतकऱ्यांची हेळसांड होते.

४. शेती क्षेत्रात शारिरीक श्रम करण्याची प्रवृत्ती कमी झाली :-

जागतिकीकरणाने संपूर्ण जग एका कुटूंबाप्रमाणे अगदी जवळ आले. वाहतुकीच्या साधनांत वाढ झाली आहे. दुरदर्शन, संगणक, मोबाईल व इतर प्रसार माध्यमांचा विकास झालेला दिसून येतो. प्राचीन काळी लोक शारिरीक श्रम करत असत परंतू आजच्या काळात शारिरीक श्रम करणे नको वाटत आहे. दिवसेंदिवस भोगवादी व ऐतखाऊ प्रवृत्ती वाढत चालली आहे. कृषी क्षेत्रात शारिरीक श्रम करण्याची प्रवृत्ती कमी झाली.[८] बहुसंख्य लोकांची कमी श्रमात अधिक मोबदला मिळविण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. या सर्वांमुळे शेतीच्या क्षेत्रातील बेकारीचा विस्तार झाला आहे.

५. कृषी क्षेत्रात यंत्राचा वाढता वापर यामुळे बेकारीची समस्या:-

आजच्या काळात कृषी क्षेत्रात विविध कामांसाठी यंत्राचा वापर करण्यात येतो. उदा. नांगरणीच्या कामासाठी ट्रॅक्टर वापरले जाते. पुर्वी शेत नांगरणीच्या काळात कित्येक लोक आठ-आठ दिवस शेतात राहून शेत नांगरणी करायचे. यात बऱ्याच शेतमजुरांची आवश्यकता लागत असे. परंतू अधुनिक काळात हेच काम केवळ एक किंवा दोन मजुरांकडून ट्रॅक्टर द्वारे काहीं तासातच पूर्ण केले जाते. अशाच पद्धतीने वर्तमान काळात शेतीतील इतर कामांसाठी यंत्राचा वापर वाढत आहे. या यंत्रामध्ये मळणीयंत्र, हार्वेस्टर, कापुस वेचणी यंत्र, जलसिंचनासाठीची साधने, औषधी किटकनाशके या साधनांचा समावेश होत आहे. पारंपारीक शेती करत असताना अधिकाधिक लोकांना काम मिळत असे. परंतू यंत्राचा वापर शेती क्षेत्रात वाढल्याने बेकारीची समस्या निर्माण झाली.

**शेतीक्षेत्रात सुधारणा करण्यासाठी उपाययोजना:-**

१. शेतीशी जोडले जाणारे बारमाही रस्ते निर्माण करणे गरजेचे आहे. ह्यातून शेती उत्पादन घटक जाणे व शेतमाल खराब न होता गोदामे किंवा बाजारापर्यंत पोचल्यास पंधरा ते वीस टक्के उत्पादित मालाची नासधूस वाचून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल.

२. बाचोस्टॅट या शेतीपयोगी उत्पादक कंपनीने सामाजिक बांधिलकी म्हणून संपूर्ण देशभरातील शेतकऱ्यांच्या मुलांसाठी आस्था शिष्यवृत्ती योजना तयार केली आहे. या योजनेमध्ये आर्थिक दुर्बल गटांतील शेतकऱ्यांच्या मुलांसाठी गुणवत्तेच्या आधारावर शिष्यवृत्ती देण्यात येते. बायोस्टॅट कंपनीच्या वतीने आत्तापर्यंत देशभरातील एक हजार विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५०० रू. या प्रमाणे ही शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे.

३. रोप एक आणि फळभाज्या दोन असे प्रयोग घेणे. बारामतीतील ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेन्ट ट्रस्टचे प्रमुख राजेंद्र पवार आहेत. या ट्रस्टने असे संशोधन केले आहे की रोप एकच आहे. त्या रोपाला खाली बटाटे लागले आहेत आणि वर त्या रोपाला टमाटे कलम केले असल्याने तया रोपाला वर टोमॅटो लागले आहेत. बारामतीच्या ट्रस्टने हे संशोधन केल्याने पाण्याची, खताची, औषधाची बचत होते. असे प्रयोग करण्यात यावेत.

४. शेतीसंबंधी शिक्षण आकाशवाणी, दुरदर्शन, संगणक, कॅसेट्स यांच्या द्वारे स्त्रीया-पुरूष, शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थीयांना मिळून त्यांना छोट्या पदविकांच्या परीक्षा ऑनलाईन दिल्याचा आनंद मिळावा हेच शेतमालाच्या प्रक्रिया उद्योगासंबंधी घडावे.

५. बँकामध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीकानातून लॉकर्सची व्यवस्था सुरू झाली आहे. तशा बँका, विमा कॉर्पोरेशनच्या सल्ल्याने गोदाम व्यवस्था चालविल्या जाव्यात.

६. शेतीमालवरील प्रक्रिया करणाऱ्या कंपन्या सुरू करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करून त्याचे अधिकार शेतकऱ्यांनाच असावेत. जेणे करून त्यांच्या विकासासाठी पाठबळ मिळेल आणि या कंपन्यांची परवानगी फक्त शेतकऱ्यांनाच मिळावी.

**संदर्भ सूची :-**


१. डॉ. सुखदेव खंदारे, भारतीय अर्थव्यवस्था, एजुकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद. जुन २०१३, पृष्ठ क्र. २३०.
२. Shodhganga.inflibnet.ac.in
३. डॉ. सुखदेव खंदारे, भारतीय अर्थव्यवस्था, एजुकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद. जुन २०१३, पृष्ठ क्र. २३०.
४. लोकसत्ता, २४ जानेवारी २०१६.
५. Marathimati.net
६. राठोड आर.डी., जागतिकीकरण प्रक्रिया आणि भारतीय शेती, Indian streams research Journal, November २०१४.
७. Mr.vikaspedia.in
८. प्रा.डॉ. दत्तात्रय भुतेकर, कृषी अर्थशास्त्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, सप्टेंबर२०१५, पृष्ठ क्र.१६३.